
दैनिक
# महाराष्ट्र जीत
मुख्य सपादक सागर राणा अभोरे सपादक बडूभाऊ इगोले

वाशीम ■ शनिवार दि. 06 डिसेंबर 2025 ■ वर्ष : 2 ले ■ अंक : 209 ■ पाने : 4 ■ किंमत : 5 रूपये ■ Title code:- MAHMUL039353



दैनिक
# महाराष्ट्र जीत
मुख्य संपादक सागर राणा अभोरे    संपादक बडूभाऊ इंगोले
RNI No - MHMUL/25/A0788
वाशीम ■ शनिवार दि. 06 डिसेंबर 2025 ■ वर्ष : 2 रे ■ अंक : 209 ■ पाने : 4 ■ किंमत : 5 रूपये ■ Title code:- MAHMUL039353

# इंडिगो नव्हे, इंडि-नो-गो!

## दिवसभरात 1 हजार उड्डाणे ३ दिवसांत २ हजारांपेक्षा जास्त विमानसेवा रद्द

महाराष्ट्र जीत

मुंबई : इंडिगो कंपनीच्या विमानांचा घोळ सलग तिसऱ्या दिवशी कायम असून शुक्रवारी देशभरातील एकूण एक हजार विमान सेवा रद्द झाल्या आहेत. गेल्या तीन दिवसांत मिळून २ हजारांपेक्षा जास्त विमान सेवा रद्द झाल्याचा मोठा मनस्ताप प्रवाशांना सोसावा लागला आहे.

आपली विमान सेवा १० ते १५ डिसेंबर दरम्यान पूर्ववत होईल, असा दावा कंपनीचे मुख्य कार्यकारी अधिकारी पीटर एल्बर्स यांनी केला आहे. इंडिगोच्या या घोळाची केंद्र सरकारने गंभीर दखल घेतली असून या प्रकरणाची सखोल चौकशी समिती करणार आहे. इंडिगोची सेवा कोलमडल्यामुळे देशातील जवळपास सर्वच विमानतळांवर मोठ्या प्रमाणावर प्रवाशांची गर्दी आहे. त्यात इंडिगो कंपनी ज्या गेटवरून विमान उडणार आहे त्यात सातत्याने बदल करत आहे. त्यामुळे प्रवाशांना आपल्या विमानाची नेमकी स्थिती काय आहे याची कोणतीही माहिती मिळत नाही.



इंडिगोतर्फे घोळ आणखी वाढत जाताना दिसत आहे. काही ग्राहकांना स्वतःहून तुमचे विमान रद्द झाल्याचे कंपनीतर्फे कळवले जात आहे. त्याच प्रवाशांना पुन्हा तुमचे विमान कोणत्या वेळेला उड्डाण करेल, याबाबत माहिती देणारे मेसेज केले जात आहेत. त्यामुळे घोळ वाढताना दिसत आहे.

२,३०० विमान उड्डाणे इंडिगो कंपनीतर्फे दिवसाकाठी देशात आणि परदेशात केली जातात. त्यातील एक हजार विमान उड्डाणे एकाच दिवसात रद्द झाली.

**पुढे काय?**

शुक्रवारप्रमाणे शनिवारी देखील कंपनीची एक हजारांपेक्षा जास्त विमाने रद्द होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

**कारण काय?**

नागरी विमान वाहतूक महासंचालनालयाने वैमानिक आणि केबिन कर्मचाऱ्यांसाठी जे नवीन वेळापत्रक १ नोव्हेंबरपासून लागू केले होते. त्याची अंमलबजावणी फसल्यामुळे कंपनीची सेवा मोठ्या प्रमाणावर विस्कळीत झाली आहे.

**उपाय काय?**

प्रवाशांचा त्रास कमी करण्यासाठी डीजीसीएने वैमानिक आणि केबिन कर्मचाऱ्यांसाठीचे नवीन वेळापत्रक रद्द केले आहे.

**इंडिगोचे बुकिंग सुरूच?**

धक्कादायक गोष्ट म्हणजे, मात्र एकिकडे घोळ सुरू असतानाही कंपनी नवीन ग्राहकांच्या प्रवाशांचे बुकिंग घेत असल्याचा दावा प्रवाशांनी केला आहे.

**इंडिगोचा ओटीपी ८.५ टक्क्यांपर्यंत घसरला**

इंडिगोचा ऑन-टाइम परफॉर्मन्स (ओटीपी) गुरुवारी ८.५ टक्क्यांपर्यंत खाली गेला. तर बुधवारी याचे प्रमाण १९.७ टक्के तर मंगळवारी ३५ टक्के होते.

**इंडिगोची दिलगिरी तिकिटाचे पूर्ण पैसे परत करणार**

विमान उड्डाणे रद्द होणे आणि विलंबाने संचालन होणे याबाबत समाज माध्यमांवर दिलगिरी व्यक्त करून इंडिगोने रद्द केलेल्या तिकिटांची पूर्ण रक्कम मूळ पेमेंट पद्धतीवर परत केली जाईल, अशी घोषणा केली. तसेच ५ ते १५ डिसेंबरदरम्यान बुकिंग रद्द करण्यात आलेल्या आणि प्रवासात बदल केलेल्या विनंत्यांवर संपूर्ण शुल्कमाफी देण्यात येईल असेही कंपनीने म्हटले.

**दिवसभरात किती विमाने रद्द?**

दिल्ली -२२०
मुंबई - १२०
हैदराबाद - ७५
बंगळुरू - ७०

याशिवाय अन्य विमानतळांवरूनही मोठ्या प्रमाणावर इंडिगोची विमाने रद्द झाली. ३.८० लाख प्रवाशांना इंडिगो कंपनीची विमाने दर दिवशी सेवा देतात.

**इंडिगोची विमानसेवा तीन दिवसांत सुरळीत होण्याची केंद्र सरकारला आशा**

नवीन फ्लाइट ड्यूटी नियम तात्पुरते स्थगित ठेवणे, तसेच अन्य उपायांमुळे इंडिगो विमान कंपनीची हवाई वाहतूक पुढील तीन दिवसांत सुरळीत होण्याची अपेक्षा आहे, असे केंद्रीय नागरी हवाई वाहतूक खात्याचे मंत्री के. राममोहन नायडू यांनी शुक्रवारी सांगितले.

हवाई वाहतुकीत निर्माण झालेल्या अडथळे व त्यामुळे उद्भवलेली स्थिती यांचा सविस्तर आढावा घेण्यासाठी नागरी हवाई वाहतूक महासंचालनालयाने चार सदस्यीय समिती स्थापन केली आहे.

समितीमध्ये संयुक्त संचालक जनरल संजय ब्राह्मणे, उपसंचालक जनरल अमित गुप्ता, वरिष्ठ फ्लाइट ऑपरेशन्स निरीक्षक कॅप्टन कपिल मांगलिक आणि फ्लाइट ऑपरेशन्स निरीक्षक कॅप्टन रामपाल यांचा समावेश आहे. या समितीने आपला अहवाल १५ दिवसांत सादर करावा असे आदेश देण्यात आले आहेत.

## पतंजली फूडस लिमिटेड कंपनीत वेतनवाढ करार संपन्न

महाराष्ट्र जीत

**प्रतिनिधी :**

पाताळगंगा औद्योगिक क्षेत्रातील इसांबे गावाजवळील पतंजली फूडस लिमिटेडमध्ये नुकताच वेतनवाढ करार संपन्न झाला. जानेवारी २०२५ ते डिसेंबर २०२७ साठी कामगार कॉंग्रेस युनियनच्या माध्यमातून झालेल्या वेतनवाढ कराराला कंपनी व्यवस्थापनाने दुजोरा दिला आहे.

या करारनाम्यात कामगारांना विविध सुविधा तसेच अनुक्रमे W4 व W5 साठी ११ हजार रूपये, W3 व W2 साठी ९ हजार ४ रूपये, W1 साठी ८ हजार ९०० रूपये पगारवाढ करण्यात आली आहे.

वेतनवाढ झालेल्या करारात कामगार कॉंग्रेसचे सचिव सुबीन बाबू थॉमस तसेच पतंजली युनिट हेड संजय भानवत, एचआर मॅनेजर संजय गावंड, कामगार प्रतिनिधी किरण देवघरे, राजन गावडे, अशोक पिंगळे, व्यंकटेश कुंभार, बाळाराम पाटील यांच्या स्वाक्षऱ्या झाल्या.





पतंजली फूडस लिमिटेडमध्ये भरघोस पगारवाढ झाल्यामुळे कामगारांमध्ये आनंदाचे व उत्साहाचे वातावरण पसरले आहे. फटाक्यांची आतिषबाजी करत कामगारांची आनंद व जल्लोष साजरा

## सिंधुदुर्ग केंद्रातून 'सूनबाई तोऱ्यात' प्रथम; 'वाट चुकलो देवा' द्वितीय

महाराष्ट्र जीत

**मुंबई, दि. ३ डिसेंबर**

६४ व्या महाराष्ट्र राज्य हौशी मराठी नाट्य स्पर्धेच्या सिंधुदुर्ग केंद्रातून वेताळ प्रतिष्ठान, सिंधुदुर्ग या संस्थेच्या 'सूनबाई तोऱ्यात' या नाटकाने प्रथम पारितोषिक पटकावले आहे. श्री राधाकृष्ण देवस्थान, मालवण या संस्थेच्या 'वाट चुकलो देवा' या नाटकास द्वितीय पारितोषिक जाहीर झाले आहे. या दोन्ही नाटकांची अंतिम फेरीसाठी निवड करण्यात आली आहे, अशी माहिती सांस्कृतिक कार्य संचालक बिभीषण चवरे यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिली.

इंद्रधनु कलामंच, दाभोली या संस्थेच्या 'मेला तो शेवटचा होता' या नाटकास तृतीय पारितोषिक मिळाले आहे. स्पर्धेतील विविध तांत्रिक व कलात्मक विभागांतील पारितोषिक विजेते पुढीलप्रमाणे आहेत:

**दिग्दर्शन:**
प्रथम – राजेश गोवेकर ('सूनबाई तोऱ्यात')
द्वितीय – नंदकुमार तळवडकर ('वाट चुकलो देवा')
तृतीय – सिध्देश सावंत ('मेला तो शेवटचा होता')

**प्रकाश योजना:**
प्रथम – यश मांजरेकर ('सूनबाई तोऱ्यात')
द्वितीय – गौरव राऊळ ('अथांग')
तृतीय – सोहम ठाकूर ('संदुक')

**नेपथ्य:**
प्रथम – अर्जुन हळदणकर ('सूनबाई तोऱ्यात')
द्वितीय – विदेश कुमठेकर ('वाट चुकलो देवा')
तृतीय – साईश नाईक ('अथांग')

रंगभूषा:
प्रथम – गोपाळ चेंदवणकर ('सूनबाई तोऱ्यात')
द्वितीय – भरत मेस्त्री ('अखेरचा सवाल')
तृतीय – पराग कुबल ('वाट चुकलो देवा')

**संगीत दिग्दर्शन:**
प्रथम – जय तळवडकर ('वाट चुकलो देवा')
द्वितीय – शांताराम कवठणकर ('येरे येरे पावसा')
तृतीय – अक्षय धांगट ('जिथून पडल्या गाठी')

उत्कृष्ट अभिनय रौप्यपदक:
सत्येंद्र जाधव ('बायको शिवाय काय खरा नाय...')
समीक्षा फडके ('अखेरचा सवाल')

**गुणवत्ता प्रमाणपत्र – अभिनय:**
सतिश खवणेकर ('वाट चुकलो देवा'), संजय नागडे ('मेला तो शेवटचा होता'), दत्ताराम गोवेकर व विधी नाईक ('सूनबाई तोऱ्यात'), प्रा. प्रदीप होडावडेकर ('बॅलन्सशिट'), वैभवी सोकटे-परुळेकर ('मेला तो शेवटचा होता'), ईशा माळकर ('येरे येरे पावसा'), हर्षदा बागायतकर ('भटाची बायपास')

दि. ६ ते २५ नोव्हेंबर २०२५ या कालावधीत मामा वरेरकर नाट्यगृह, मालवण व मधुसूदन कालेलकर नाट्यगृह, वेंगुर्ला येथे झालेल्या या स्पर्धेत एकूण १७ नाट्यप्रयोग सादर करण्यात आले. परीक्षक म्हणून सुरेंद्र केतकर, विजय कोलवणकर आणि सुजाता गोडसे यांनी काम पाहिले.

सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव डॉ. किरण कुलकर्णी यांनी सर्व विजेत्यांचे अभिनंदन केले. तर सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार यांनी पारितोषिक विजेते संघ व कलाकारांचे कौतुक करत, भविष्यातही दर्जेदार नाट्यकृती सादर करण्याचे आवाहन केले.

## सुधागडात थंडीची लाट; पोपटीच्या हंगामामुळे शेतात रात्री मेजवानींची धूम

महाराष्ट्र जीत **सुधागड-पाली**

सुधागड तालुक्यात गेल्या आठवड्यापासून थंडीची तीव्र लाट जाणवत असून, पहाटेपासून दाट धुके, शिरशिरी आणणारा गार वारा आणि दिवसभर टिकणारे थंड हवामान यामुळे संपूर्ण परिसरात गारठा वाढला आहे. सकाळच्या वेळेस तापमानात लक्षणीय घट होत असून शाळकरी विद्यार्थी, शेतकरी आणि वयोवृद्ध नागरिक उबदार कपड्यांचा आधार घेताना दिसत आहेत. संध्याकाळनंतर वातावरण अधिकच थंड होत असून गावागावांत धुरकट वातावरणाची पांघरूण पसरली आहे.

थंडीमुळे आरोग्याची विशेष काळजी घेण्याचे आवाहन आरोग्य विभागाने केले आहे. गरम पाणी, सूप, उबदार कपडे आणि सकाळच्या धुक्यातून बाहेर पडताना खबरदारी घेण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. मात्र या थंडीच्या पार्श्वभूमीवर सुधागडातील ग्रामजीवनात उलट उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

थंडी आणि चव यांचा सुरेख संगम म्हणजे पोपटीचा हंगाम. सुधागडातील कुटुंबांमध्ये पोपटी पार्टी ही एक सणासारखी परंपरा बनली आहे. कामानिमित्त बाहेर गेलेले सदस्यही आठवड्याअखेरीस गावात परत येत असून, शेतात रात्रीच्या वेळी चुलीभोवती बसून पारंपरिक पोपटीचा आस्वाद घेत गप्पा, गाणी आणि शेकोटीचा आनंद घेत आहेत. मुलांसाठीही हा काळ आनंदाचा असून शेतातील अनुभव आणि उबदार वातावरण त्यांना खास वाटत आहे. बाजारात ताज्या पोपटी शेंगांना चांगली मागणी असून दरही स्थिर आहेत.वालाच्या शेंगा, हरभरे, बटाटे, कोवळ्या भाज्या आणि मसाल्यांचे मिश्रण करून तयार होणारी पोपटी ही थंडीच्या दिवसांत पौष्टिक आणि चविष्ट मेजवानी ठरते. अनेक ठिकाणी सलग दोन-तीन दिवस पोपटी पार्टीचे आयोजन होत असून, ही परंपरा आजही ग्रामीण संस्कृतीचा अविभाज्य भाग म्हणून जपली जात आहे. दरवर्षीप्रमाणे यंदाही थंडी सुरू होताच पोपटीच्या





सुगंधाने परिसर भारून गेला आहे. थंडी, शेकोटी, चुलीचे वातावरण आणि पोपटी यांचा संगम झाल्याने सुधागडात 'हिवाळी सेलिब्रेशन'ची नवी ओळख निर्माण झाली आहे. लोकगीतांचे सूर, तारांकित आकाश आणि स्नेहाचा उबदार माहोल यामुळे ग्रामीण भागात आनंदाचे वातावरण अधिकच गडद झाले आहे.

## संपादकीय

### चापलूस एआय तुमची हुजरेगिरी करायला सोकावले आहे!

'ढवळ्याशेजारी पवळ्या बांधला, वाण नाही पण गुण लागला' ही म्हण माहीत नसलेला मराठी माणूस विरळाच! संगतीमुळे मनुष्यावर चांगल्यापेक्षा वाईट गोष्टींचा परिणाम लवकर होतो, हा त्या म्हणीचा मथितार्थ; परंतु माणसाच्या संगतीत चक्क कृत्रिम बुद्धिमत्ता म्हणजेच एआयचा पवळ्या झाल्याचा निष्कर्ष ताज्या संशोधनांतून निघाला आहे. अनेक लोकप्रिय एआय चॅटबॉट वापरकर्त्याला आवडणारी, त्याला हवी तशीच उत्तरे देऊ लागले आहेत. हुजरेगिरी किंवा चापलुसीत एआयने मानवालाही मागे सोडले आहे, असे नव्या अभ्यासांतून समोर आले आहे. संशोधकांच्या वेगवेगळ्या गटांनी या विषयावर प्रसिद्ध केलेल्या शोधनिबंधांचे निष्कर्ष कमीअधिक फरकाने सारखेच आहेत. एआय चॅटबॉट वापरकर्त्याला खूश करण्यासाठी, त्याचा अहंगंड गोंजारण्यासाठी त्याला आवडतील, अशीच उत्तरे देऊ लागले आहेत, हे या संशोधनांचे सार!

एखादा वापरकर्ता जेव्हा एआय चॅटबॉटला प्रश्न, माहिती विचारतो किंवा सल्ला मागतो, तेव्हा चॅटबॉट खूप सहजतेने वापरकर्त्याच्या भूमिकेशी सहमत होतात किंवा वापरकर्त्याला जे ऐकायचे आहे, तेच सांगतात, मग ते चुकीचे असो, अनैतिक असो किंवा त्या माहितीवर आधारित निर्णय घेण्यात धोका असो! एआयच्या या प्रवृत्तीकडे संकट म्हणून बघायला हवे; कारण मनुष्य हळूहळू एआयवर विसंबून राहू लागला आहे आणि त्याचे प्रमाण भविष्यात वाढतच जाणार आहे. संशोधनांतून असे समोर आले आहे की, वापरकर्ता जेव्हा एखादे चुकीचे किंवा तर्कविहीन विधान करतो, तेव्हा चॅटबॉट तसे निदर्शनास आणून देण्याऐवजी वापरकर्त्याशी सहमती दर्शवतात.

आतापर्यंत एखाद्या गोष्टीबाबत अधिक जाणून घेण्यासाठी 'सर्च इंजिन'चा वापर व्हायचा. त्या माध्यमातून विविध पर्याय मिळत आणि त्यापैकी योग्य कोणता, हे वापरकर्ता सारासारबुद्धीचा वापर करून ठरवू शकत असे. एआय चॅटबॉट हाताशी आल्यापासून बहुतांश लोकांनी 'सर्च इंजिन'चा वापर जवळपास बंदच केला आहे. चॅटबॉटने दिलेली उत्तरे किंवा माहिती ते 'बाबा वाक्यं प्रमाणं' म्हणून स्वीकारतात. अशात चॅटबॉटने वापरकर्त्यास खूश करण्यासाठी त्याला हवे असलेलेच उत्तर अथवा सल्ला दिला, तर अनर्थ होऊ शकतो.

मानसिक तणाव, एकाकीपणाला तोंड देत असलेले लोक एआयकडे मित्र, सखा म्हणून बघायला लागतात. कोवळ्या वयातील मुले बोलायला कोणी नाही म्हणून एआयशीच बोलत सुटली आहेत. जपानमधील एका युवतीने तर चक्क एआयचा वापर करून तयार केलेल्या 'क्लाउस' नामक 'बॉयफ्रेंड'सोबत लग्नच केले! अशा निरर्थक नात्यांमुळे वास्तव मानवी नातेसंबंधांचा प्रभाव कमी होतो. शिवाय चिकित्सकीय किंवा मनोवैज्ञानिक मदतीऐवजी एआयकडून अवास्तव आश्वासने मिळाल्यामुळे स्थिती अधिकच बिकट बनू शकते.

संशोधनांतून असेही समोर आले आहे की, एखादा वापरकर्ता जेव्हा एआयकडून अभ्यास, आर्थिक, वैवाहिक, वैयक्तिक विकास, आरोग्य इत्यादी बाबींमध्ये सल्ला घेतो, तेव्हा एआयने त्याच्या विचारांना पुष्टी दिल्यास वापरकर्ता तो सल्ला अधिक आत्मविश्वासाने स्वीकारतो; पण जर एआयने चापलुसी करत वापरकर्त्याला आवडेल असा सल्ला दिला असेल आणि तो चूक असेल, तर त्यावर आधारित निर्णय चुकीचे ठरतात. अशा चुकीच्या पुष्टीमुळे वैयक्तिक निर्णयप्रक्रियेत भ्रामक आत्मविश्वास निर्माण होण्याचा धोका असतो. चापलुसी करणारे बॉट वापरणारे नवशिके स्वतःचे चुकीचे दृष्टिकोन टिकवून ठेवतात; कारण बॉटने त्यांना पुष्टी दिलेली असते.

एआय-आधारित माहितीवर अवलंबून राहिल्याने, वैयक्तिक क्षमता, विश्लेषणशक्ती, स्वतंत्ररीत्या विचार करण्याची क्षमता कमी होण्याची शक्यता आहे. जेव्हा अनेक लोक एआयवरून त्यांचे विश्वास किंवा पूर्वग्रहांची पुष्टी करून घेतात, तेव्हा समाजात त्या विश्वासांचा पक्का आधार निर्माण होतो. तो चुकीचा किंवा पूर्वग्रहाधारित असेल, तर तो सामाजिक समज, नैतिकता, वर्तनशैली यांना चुकीच्या दिशेने वळवू शकतो. विशेषतः धर्म, जाती, राजकारण, सामाजिक संघर्ष अशा संवेदनशील बाबींमध्ये हा धोका अधिक संभवतो.

एआय मॉडेल्सचे प्रशिक्षण प्रामुख्याने इंटरनेटवरील विदावर आधारित असते; पण विदा शुद्ध, संतुलित किंवा सत्य नसल्यास, त्यावर आधारित एआयचे सल्ले चुकीचे, पूर्वग्रहित किंवा भ्रामक असू शकतात. परिणामी त्यावर अवलंबून असलेली प्रणालीच अंततः अविश्वासार्ह बनू शकते. हे धोके टाळण्यासाठी एआय वापरताना जागरूकता, डिजिटल साक्षरता व विचारक्षमता वाढवणे, एआय विकासक कंपन्यांचे उत्तरदायित्व - नियमन वाढवणे, सामाजिक संवाद आणि मानवी संबंधांचे वर्चस्व टिकवणे आत्यंतिक गरजेचे झाले आहे. एआय ही मानवतेसाठी प्रचंड ताकद आहे; पण प्रत्येक शक्तीसोबत जबाबदारीही येत असते. इतिहासात हुजरे आणि चापलूस अनेक प्रबळ साम्राज्यांच्या पतनास कारणीभूत ठरले होते. एआयचा वापर करताना ही वस्तुस्थिती लक्षात ठेवणे गरजेचे आहे!

# हतबल विरोधक महाराष्ट्राने कधीच पाहिले नव्हते..

नगरपालिका आणि नगरपचायत निवडणुकांचा प्रचार अंतिम टप्प्यात आला आहे. येत्या बुधवारी म्हणजे ३ डिसेंबर रोजी नगरपालिका आणि नगरपंचायत निवडणुकांचे निकालही लागतील. या निवडणुकांसाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व भारतीय जनता पक्षाचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण तसेच भाजपचे अन्य मंत्री, पदाधिकारी संपूर्ण राज्यभर हिंडून प्रचार करत आहेत. प्रचाराच्या या धामधुमीत ज्येष्ठ नेते शरद पवार, उद्धव ठाकरे तथा उबाठा, राज ठाकरे, काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, नाना पटोले, विजय वडेट्टीवार ही मंडळी पूर्णपणे गायब होती. महाविकास आघाडीच्या कळपात दाखल होऊ इच्छिणारे श्रीमान राज ठाकरे हेही प्रचारसभा घेताना दिसले नाहीत. महाविकास आघाडीच्या प्रमुख नेत्यांची प्रचारातील ही अनुपस्थिती राज्यातील विरोधकांच्या हतबलतेची विदारक स्थिती दर्शविणारी आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे दिवसात किमान चार-पाच जाहीर सभांना संबोधित करत होते. फडणवीस यांच्या झंझावाती प्रचार दौऱ्याला मतदारांनी मोठा प्रतिसाद दिला होता. भारतीय जनता पक्षाचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या प्रचारसभांनाही जनतेकडून चांगला प्रतिसाद मिळाला. मुख्यमंत्री फडणवीस यांनी आपल्या प्रचारसभांमधून विरोधकांवर टीका-टिपण्णी करण्याऐवजी राज्यातील विकासकामांबद्दल त्या-त्या शहरांच्या भविष्यातील विकास योजनांवर भर दिला. केंद्रातील नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकारच्या मदतीने राज्य सरकारने कोणकोणते विकास प्रकल्प हाती घेतले आहेत, याची सविस्तर माहिती मुख्यमंत्री फडणवीस यांनी आपल्या प्रचारसभांमधून दिली. केलेली कामे आणि भविष्यात करावयाची कामे याची यादी जनतेपुढे ठेवत मुख्यमंत्री फडणवीस, भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, राज्य सरकारमधील भाजपचे मंत्री, पक्षाचे पदाधिकारी यांनी मतदारांकडून विकासाच्या मुद्द्यावर कौल मागितला. विरोधकांवर चमचमीत भाषेत टीका-टिपण्णी करण्याऐवजी भारतीय जनता पक्षाच्या नेतृत्वाने ही निवडणूक सकारात्मक मुद्द्याच्या आधारे लढवली.

आपल्या शहराचा विकास करावयाचा असेल तर केंद्रात आणि राज्यात ज्या पक्षाची सत्ता आहे त्याच पक्षाच्या हातात नगरपालिकेची, नगरपंचायतीची सूत्रे दिली पाहिजेत, यावर भारतीय जनता पक्ष नेतृत्व मतदारांचे प्रबोधन करण्याचा प्रयत्न या निवडणुकीच्या माध्यमातून करत आहे. त्या शहराच्या विकासासाठी राज्य सरकारने काय केले, केंद्र सरकारच्या माध्यमातून त्या शहरातील विकास प्रकल्पांना किती निधी दिला, याची आकडेवारी जनतेपुढे या निमित्ताने ठेवली. तसेच भारतीय जनता पक्षाच्या नेतृत्वाने आपल्या सरकारच्या कामाचा हिशोबही मतदारांपुढे ठेवला. केंद्र आणि राज्य सरकारच्या कामांची माहिती मतदारांना देणे हे सत्ताधारी पक्षाचे कर्तव्य आहे. सत्तेवर येण्यापूर्वी मतदारांना दिलेली आश्वासने कोणत्या पद्धतीने पूर्ण झाली आहेत, हेही सत्ताधाऱ्यांनी मतदारांना सांगितले पाहिजे. आपल्या कामाचा अहवाल, प्रगती पुस्तक मतदारांपुढे ठेवण्याची ही चांगली संधी आहे, हे ओळखून भारतीय जनता पक्ष नेतृत्वाने सर्व प्रचारसभांमध्ये विरोधकांवर टीका करणे टाळले.

बरोब्बर एक वर्षापूर्वी विधानसभा निवडणुकीत मतदारांनी महाविकास आघाडीचा धुव्वा उडवत महायुतीला प्रचंड बहुमत प्रदान केले. पराभवाच्या या धक्क्यातून उबाठा, ज्येष्ठ नेते शरद पवार, राज ठाकरे आणि काँग्रेसमधील समस्त नेतेगण अजूनही सावरू शकलेले नाहीत. उबाठा तथा उद्धव ठाकरे यांना मुंबई महापालिकेच्या निवडणुकीखेरीज अन्य कोणत्याही स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत रस नाही, हे या निमित्ताने पुन्हा जगापुढे आले आहे. असे असहाय्य विरोधक महाराष्ट्राने यापूर्वी कधीच पाहिले नव्हते. १९८४च्या लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्रात भारतीय जनता पक्षाला एकही जागा मिळू शकली नव्हती. तरीही पक्षाचे नेतृत्व खचले नव्हते. त्या पुढील प्रत्येक निवडणुकीत भारतीय जनता पक्षाचे नेतृत्व आणि कार्यकर्ते जिद्दीने मैदानात उतरले. त्यामुळेच १९८४नंतर अवघ्या ११ वर्षांत राज्यात भारतीय जनता पक्षाने शिवसेनेच्या साथीने राज्यात सरकार स्थापन केले. ज्येष्ठ नेते शरद पवार यांनीही १९८० ते डिसेंबर १९८६ या काळात विरोधी पक्षात असताना आपल्या समाजवादी काँग्रेस या पक्षाची बांधणी करण्यासाठी संपूर्ण राज्य अनेकदा पालथे घातले होते. राज्यातील काँग्रेसच्या नेत्यांना विरोधी पक्षाची भूमिका प्रामाणिकपणे बजावण्याची कधीच सवय नव्हती. 'असेल हरी तर देईल खाटल्यावरी' या म्हणीप्रमाणे दिल्लीतील गांधी घराण्यातील नेता आपल्याला सत्ता मिळवून देईल, ती सत्ता आपण भोगायची अशी सवय राज्यातील काँग्रेस नेत्यांना लागली आहे. त्यामुळे नगरपालिका आणि नगरपंचायती निवडणुकांमध्ये राज्यातील काँग्रेस नेतृत्व हातपाय हलवेल, अशी अपेक्षा कोणालाच नव्हती. मागील विधानसभा निवडणुकीत उबाठा गटाला २० जागा मिळाल्या. महाविकास आघाडीत सर्वाधिक जागा उबाठा गटाला मिळाल्या. त्यामुळे राज्यात उबाठा गट हाच प्रमुख विरोधी पक्ष आहे, या नात्याने उद्धव ठाकरे हे विधानसभेतील विरोधी पक्षनेतेपद आपल्या पक्षाला मिळावे, अशी मागणी वारंवार करतात. मात्र मुख्य विरोधी पक्ष या नात्याने आपण मतदाराला बांधिल आहोत, हे दाखवण्यासाठी उबाठा गटाने नगरपालिका निवडणूक प्रचारात सहभागी होण्याचे कर्तव्य बजावलेले नाही.

सध्या उद्धव ठाकरे यांना फक्त मुंबई महापालिकेच्या पोपटाचा डोळा दिसत आहे. मुंबई महापालिका ताब्यात ठेवण्यासाठी त्यांनी राज ठाकरेंपुढे लोटांगण घातले आहे. ज्या भावाला गेली १८ वर्षे उद्धव ठाकरेंनी ओळख दाखवली नाही, तो भाऊ आता त्यांच्यासाठी प्राणप्रिय ठरला आहे. एकीकडे सत्ताधारी मतदारांपुढे जाण्यासाठी प्रचंड सक्रिय, तर दुसरीकडे मनाने गळपटलेले विरोधक असे कमालीचे विषम चित्र या निवडणुकीच्या आखाड्यात दिसले. राज्याला भविष्यकाळात तरी सक्षम विरोधी पक्ष मिळो, एवढीच इच्छा या निमित्ताने व्यक्त करता येईल.

**केशव उपाध्ये,**
**प्रदेश मुख्य प्रवक्ते, भाजप**

# जनआंदोलकांच्या सहाय्यासाठी वकिली 'नजर'!

**वकील व सामाजिक कार्यकर्त्यांना एकत्र आणणाऱ्या 'नजर' या मंचाने धारवाडमध्ये राष्ट्रीय परिषद घेऊन लोकशाही, न्याय आणि नागरिकांच्या हक्कांसाठी एकत्र काम करण्याचा निर्धार व्यक्त केला. सध्याच्या कठीण परिस्थितीत अन्यायाविरुद्ध उभे राहणाऱ्यांना कायदेशीर मदत देण्याचेही ठरविले आहे.**

वकिली व्यवसायातील अनेकांनी सामाजिक-राजकीय आंदोलनात नेहमीच महत्त्वाची भूमिका बजावली आहे. जनतेला न्यायालयातून न्याय मिळवून देण्याच्या कामात मदतगार असणाऱ्या अनेक वकिलांनी, स्वातंत्र्यलढ्यापासून आजतागायत महत्त्वपूर्ण सामाजिक-राजकीय सक्रियता दाखवली आहे. सामाजिक कार्यकर्ते आणि वकिलांचे परस्पर संबंध नेहमीच एकमेकांकडून शिकण्या-शिकवण्याचे आणि न्यायालयीन व जमिनी संघर्षात परस्परपूरकता दाखवणारे राहिलेले आहेत. सध्याच्या काळात संसदेत वा विधानसभेतील बहुमताच्या आधारे अनेक जनहिताचे कायदे राजकीय फायद्यांसाठी बदलण्यात आले आहेत. महाराष्ट्रात कार्यकर्त्यांना अर्बन नक्षल ठरवत जरब बसवणारे जन सुरक्षा कायद्यासारखे नवे कायदेही बनवण्यात आले आहेत. लेह-लडाखमधील स्थानिक नागरिकांच्या न्याय्यहक्कांसाठी सनदशीर मार्गांनी व शांततापूर्ण पद्धतीने लढणाऱ्या शिक्षण आणि तंत्रज्ञान तज्ज्ञ सोनम वांगचूक या कार्यकर्त्यास थेट राष्ट्रीय सुरक्षा कायद्याखाली अटक करण्याची बाब ताजी आहे. अशावेळी सामाजिक कार्यकर्त्यांच्या न्यायालयीन लढतींसाठी भरमसाट वकिली फी न आकारता अनेकदा मोफतही मदत करणाऱ्या वकिलांचे योगदान अत्यंत महत्त्वाचे आहे. जन आंदोलनांचा राष्ट्रीय समन्वयने (एनएपीएम) दोन वर्षांपासून विविध विषयवार मंच स्थापन करण्यास सुरुवात केली. अभिवक्त्यांच्या धडपडीला एक सुव्यवस्थित व संघटनात्मक स्वरूप देणारा त्यातील एक महत्त्वाचा मंच म्हणजे हा वकील व कार्यकर्त्यांचा मंच. या मंचाला नाव देण्यात आले, 'न्याय, जबाबदेही आणि हक्कांसाठी राष्ट्रीय मंच' (नॅशनल अलायन्स फॉर जस्टिस, अकाऊंटेबिलिटी अँड राइट्स-'NAJAR'-'नजर'). एका पद्धतीने व्यवस्थेने जबाबदारीने वागावे यासाठी, न्यायाच्या मार्गाने व लोकांच्या हक्कांसाठी 'नजर' ठेवून असणाऱ्यांचा हा मंच! मागील महिन्यात कर्नाटकातील धारवाड येथे 'नजर'ने आयोजित केलेल्या तिसऱ्या तीन दिवसीय राष्ट्रीय परिषदेत, संवैधानिक न्याय आणि लोकांच्या चळवळींप्रतिच्या आपल्या सामूहिक वचनबद्धतेचा पुनरुच्चार केला. परिषदेत देशभरातील अनेक कायदेतज्ज्ञ, कार्यकर्ते, कायदा संशोधक आणि कायद्याचे विद्यार्थी एकत्र आले होते. त्यांनी देशातील लोकशाहीसमोरील सध्याच्या संकटावर एकत्रितपणे विचारमंथन केले आणि लोककेंद्रित कायदेशीर हस्तक्षेपांसाठीची रणनीती आखली. परिषदेत सध्याच्या राजकीय वातावरणात गंभीर धोक्यात असलेल्या धर्मनिरपेक्षता, सामाजिक न्याय, समानता आणि लोकशाही स्वातंत्र्य या 'नजर'च्या मूलभूत मूल्यांचे महत्त्व पुन्हा एकदा अधोरेखित केले गेले.

**चळवळी व न्यायालयीन प्रयत्न एक साथ**

परिषदेची सुरुवात सांस्कृतिक कार्यक्रमाने झाली. नंतर कायदेशीर हस्तक्षेप आणि एकता या संदर्भातील 'नजर'च्या गेल्या दोन वर्षांच्या वाटचालीचा आढावा मांडण्यात आला. त्यानंतर 'संविधान संकटात असताना पुरोगामी चळवळी आणि न्यायालयीन संघर्षातील संभाव्य सहकारी' या विषयावरील परिसंवादाने उद्घाटन सत्र संपन्न झाले. या सत्रात एनएपीएमच्या संस्थापक सदस्य आणि ज्येष्ठ कार्यकर्त्या मेधा पाटकर, वरिष्ठ वकील ॲड. गायत्री सिंग, ॲड. वसुधा नागराज, जबीना खानम आणि डॉ. इसाबेला झेवियर यांनी संवैधानिक नैतिकतेचे वाढते अवमूल्यन, सार्वजनिक आणि संवैधानिक संस्थांची कमी होत चाललेली स्वायत्तता आणि अन्यायाचा प्रतिकार करण्यासाठी वकील आणि लोकांच्या चळवळींमध्ये जवळून सहकार्याची आवश्यकता यावर आपापल्या मांडणीत भर दिला. या सत्रात भारतातील लोकशाही हक्कांसाठीच्या व्यापक संघर्षात, 'नजर'ने केलेल्या अल्प परंतु महत्त्वपूर्ण योगदानाची सर्व वक्त्यांनी आवश्यकता अधोरेखित केली. पुढील सत्रात लिंग समभाव व न्याय, कामगार हक्क, नागरी स्वातंत्र्य, जमीन-जंगले व पर्यावरण आणि उपेक्षित समुदायांचे हक्क या विषयांवर गटचर्चा झाल्या. यामध्ये लोकहक्कासाठीचे न्यायालयीन खटले, कायदेशीर मदत, कायदेविषयक आणि धोरणात्मक वकिली, तथ्य-शोध, संशोधन, क्षमता बांधणी आणि तळागाळातील लोकांचे संघटन यासह विविध धोरणांवर तपशीलवार चर्चा केली. राज्यनिहाय आणि प्रदेशनिहाय बैठकांनी स्थानिक संघर्षांवर आधारित २०२६ साठी ठोस योजना तयार करण्यात आल्या. परिषदेत उपस्थित कायद्याचे विद्यार्थी आणि प्राध्यापकांनी, कायद्याच्या शिक्षणात घटनात्मक मूल्यांसोबतचे संबंध अधिक मजबूत कसे करता येतील यावर विचारविनिमय केला.

सामाजिक आणि कायदेशीरदृष्ट्या सध्याच्या महत्त्वाच्या मुद्द्यांवर, विशेषतः एसआयआर, पर्यावरणीय मंजुरी प्रकल्प सुरू केल्यानंतरही घेण्याबाबतचा सर्वोच्च न्यायालयाचा अलीकडचा निकाल, संस्थात्मक आणि न्यायिक स्वायत्तता आणि जबाबदेही, समता-आधारित कायदेशीर शिक्षणाला पाठिंबा, कामगार संहितांच्या अंमलबजावणीला विरोध, लडाख, पॅलेस्टाईन आणि इतर ठिकाणच्या जनतेच्या संघर्षांना पाठिंबा आदींवर ठराव मंजूर करण्यात आले.

परिषदेत 'धारवाड घोषणापत्र'ही मंजूर करण्यात आले. येत्या वर्षासाठी 'नजर'ची सामायिक वचनबद्धता आणि भारतीय जनतेच्या संघर्षांशी सहकार्य वाढवण्याचा 'नजर'चा संकल्प त्यात व्यक्त करण्यात आला. शासनाच्या वाढत्या हुकूमशाहीचा प्रतिकार करण्याचा व लोकशाहीत उपलब्ध अवकाश विस्तारत नेण्याचा निर्धार, या जाहीरनाम्यात व्यक्त करण्यात आला आहे.

**२६ जानेवारीपर्यंत न्याय अभियान**

'सर्वसमावेशक न्यायासाठी विविध मार्ग' या विषयावरील परिसंवादाने परिषदेचा समारोप करण्यात आला. या सत्रात ॲड. इंदिरा उन्नीनयर, प्रा. गणेश देवी, ॲड. अल्बर्टिना अल्मेडा, अरविंद नरैन आणि ॲड. सेलेनमांग हाओकिप यांचा समावेश होता. यावेळी वक्त्यांनी अधोरेखित केले की, भारतात विविध प्रकारच्या हस्तक्षेपातून न्याय मिळवण्याचे प्रयत्न जारी ठेवले पाहिजेत. या सत्रादरम्यान, हुबळीमधील काही गंभीर घटनांमध्ये मुस्लिम समुदायाच्या सदस्यांविरुद्ध यूएपीए कायद्याचा गैरवापर उघड करणारा व न्यायालयीन प्रक्रियेत काही खटल्यांमध्ये विशिष्ट समाज घटकांस कसे लक्ष्य बनवले जात आहे हे उघड करणारा, 'नजर' आणि पीपल्स युनियन फॉर सिव्हिल लिबर्टीज (पीयूसीएल) यांनी संयुक्तपणे तयार केलेला तपशीलवार अहवाल प्रसिद्ध करण्यात आला.

'नजर'चे कार्य प्रभावी आणि पद्धतशीर पद्धतीने बळकट करण्यासाठी 'नजर'चा २५ सदस्यांचा राष्ट्रीय कार्यगट स्थापन करण्यात आला. संपूर्ण भारतात, या परिषदेतील प्रमुख निर्णय पुढे नेण्यासाठी, 'नजर न्याय अभियान' हाती घेण्याचा संकल्प केला.

**सत्तेला सत्य सांगण्याचे धाडस करणाऱ्यांना पाठिंबा**

मागील महिन्यात २ तारखेला तमिळनाडू राज्यातील तिरुनलवेली जिल्ह्यात अरापोर अवैध खाणकामाविषयी आयोजित कायदेशीर सार्वजनिक सुनावणीदरम्यान विनोद कुमार आणि अरोगियासामी यांच्या नेतृत्वाखालील समूहाने सुनावणीमध्ये घुसखोरी करून कार्यवाही उधळली, खुर्च्या फेकल्या, धमक्या दिल्या. यावेळी पीपल्स युनियन फॉर सिव्हिल लिबर्टीज (पीयूसीएल)चे राष्ट्रीय सरचिटणीस, ज्येष्ठ मानवी हक्क संरक्षक अधिवक्ता डॉ. व्ही. सुरेश यांच्या डोक्याला मार लागून रक्तस्त्राव झाला. घटनास्थळी पोलीस उपस्थित असूनही हिंसा रोखण्यात ते पूर्णपणे अपयशी ठरले. 'हा सर्व धाकदपटशा आणि हिंसाचार पूर्वनियोजित होता, ज्याचा उद्देश अवैध खाणकामामुळे झालेल्या पर्यावरणीय हानीबाबत गावकऱ्यांच्या म्हणण्याला दडपणे होता. खाणमाफियाचा राजकीय पाठबळासह चालवलेला हा संघटित हल्ला आहे,' अशा शब्दांत 'नजर'ने या घटनेचा निषेध केला.

'या प्रकरणाच्या निष्पक्ष चौकशीसाठी मद्रास उच्च न्यायालयाच्या माजी न्यायाधीशांच्या देखरेखीखाली विशेष तपास पथक (एसआयटी) स्थापन करावे. घटनेच्या वेळी उपस्थित असलेले आणि कर्तव्यच्युती केलेले पोलीस अधिकारी निलंबित करून त्यांच्यावर विभागीय व फौजदारी कारवाई करावी. पोलिसांच्या गुप्तचर यंत्रणेच्या अपयशाचीही चौकशी करावी. तमिळनाडू सरकारने डॉ. सुरेश, जयराम आणि पीयूसीएल व अरापोर आंदोलनातील इतर सदस्यांना तातडीचे संरक्षण द्यावे, जेणेकरून ते भीतीशिवाय आपले संवैधानिक आणि पर्यावरणीय हक्कांचे कार्य सुरू ठेवू शकतील', अशी मागणी 'नजर'ने केली. 'ही वेळ नैतिक स्पष्टता आणि संस्थात्मक धैर्य दाखवण्याची आहे. डॉ. सुरेश यांच्यावरचा हल्ला हा केवळ गुंडगिरी नसून, सत्तेला सत्य सांगण्याचे धाडस करणाऱ्या प्रत्येक नागरिकाला दिलेला इशारा आहे. राज्याने जर निर्णायक पावले उचलली नाहीत तर कायद्याचे राज्य कमजोर होईल', असा इशाराही देण्यात आला.

**जन आंदोलनांचा राष्ट्रीय समन्वयाच्या**
**राष्ट्रीय कार्यगटाचे**

## दिव्यांची विद्यार्थ्यांना ' स्वेटर्सचे ' वितरण..

महाराष्ट्र जीत

**देवळाली कॅम्प प्रतिनिधी गोकुळ लोखंडे**

दिव्यांग बालके विविध प्रकारच्या शारीरिक, मानसिक, बौद्धिक व आर्थिक अडचणींचा सामना करत शिक्षण घेत असतात. तसेच सध्या थंडीचा वाढता प्रकोप पाहता त्यांचे आरोग्य अबाधित राहावे
व मायेची ऊब मिळावी या भावनेतून नाशिक मंदिर प्रसिद्ध उद्योगजक श्री हरिष गुरनानी यांनी आपल्या वाढदिवसाच्या निमित्ताने ऑल इंडिया डिसेबल्ड रिहॅ. एज्यु. इन्स्टिट्यूट, नाशिक रोड.
या संस्थेच्या अधिपत्याखालील तीन शाळांमध्ये शिक्षण घेणाऱ्या दिव्यांग बालकांना स्वेटर्स चे वितरण केले.
संस्थेच्या सचिव डॉ सौ सुहासिनी घोडके यांनी पाहुण्यांचे स्वागत केले.या कार्यक्रमाचे यजमान पद प्रसिद्ध सामाजिक कार्यकर्त्या सौ. रितिका कलानी यांनी भूषविले. यावेळी निकीता, निशा व निलेश गुरनानी उपस्थित होते.



थंडीच्या दिवसात मिळणारी ऊबदार भेट पाहून विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद ओसंडून वाहत होता.
मुलांचे विविध गुणदर्शन आणि कलाकृती सादर करिता उत्सवमूर्ती ना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्यात. हे पाहून उपस्थित पाहुणे भारावून गेले.
उपस्थितांनी संस्थेच्या कार्याचे, शिक्षकांचे व शिक्षकांचे तोंड भरून कौतुक केले.
कमल उबाळे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले
राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

## वंचित बहुजन आघाडी जिल्हा कार्यकारिणीची जिल्हाध्यक्ष चेतन गांगुर्डे यांच्या अध्यक्षतेखाली महत्त्वाची बैठक संपन्न

महाराष्ट्र जीत

**देवळाली कॅम्प प्रतिनिधी गोकुळ लोखंडे**

वंचित बहुजन आघाडी नाशिक जिल्हा पश्चिमची जिल्हा अध्यक्ष चेतन गांगुर्डे यांच्या अध्यक्षतेखाली आगामी होऊ घातलेल्या महानगरपालिका व जिल्हा परिषदेच्या निवडणुकीसंदर्भात अत्यंत महत्त्वाची बैठक पार पडली.

त्यावेळेस बैठकीला जिल्हा प्रवक्ते बाळासाहेब शिंदे, जिल्हा उपाध्यक्ष- विश्वनाथ भालेराव, उपाध्यक्ष- एड.भारत बुकाने, उपाध्यक्ष- एड.भाऊसाहेब अहिरे, सचिव-बाळासाहेब जाधव, संघटक-सागर रिपोर्टे, संघटक-दीपक भंडारी. संम्यक जिल्हाध्यक्ष मिहीर गजभे उपस्थित होते. होऊन गेलेल्या नगरपरिषदेच्या निवडणुकी संदर्भात विचार मंथन करण्यात आले. आलेल्या बऱ्या वाईट अनुभवातून पक्ष पदाधिकाऱ्यांना काहीतरी नवीन शिकायला मिळाले असे मत सर्वांनी मांडले. त्यानंतर होऊ घातलेल्या जिल्हा परिषद व महानगरपालिका निवडणुकी संदर्भात सखोल चर्चा करण्यात आली. वंचित बहुजन आघाडीने इतर पक्षाची युती,आघाडी करून निवडणूक लढवायची की स्वतंत्र पने निवडणुकीला सामोरेजायचे या संदर्भात पदाधिकाऱ्यांनी आपली भूमिका मांडली. त्यानंतर स्वतंत्रपणे निवडणूक लढवणाऱ्या उमेदवारांची चाचणी करून त्यावर चर्चा



करण्यात आली. बैठक अत्यंत खेळीमेळीच्या वातावरणामध्ये संपन्न झाली. बैठकीचा अहवाल पक्ष नेत्यांना पाठवून त्यावर त्यांचा सल्ला व परवानगी घेऊन पुढील प्रक्रिया सुरुवात करण्यात येईल असे एकमताने ठरविण्यात आले.

महाराष्ट्र जीत हे दैनिक वृत्तपत्राचे संपादक सागर रामदास अंभोरे यांनी महामाया प्रिंटिंग प्रेस श्रीराम अपार्टमेंट गणेदिवाल लेआउट भाग्य नगर, अमरावती,महाराष्ट्र-४४४६०२ येथे मुद्रीत करुन दैनिक महाराष्ट्र जीत कार्यालय घर क्रमांक ८९, प्रियदर्शनी कॉलनी, बायपास प्रभाग क्रमांक ८ कारंजा, वाशिम, महाराष्ट्र - ४४४१०५. येथे प्रकाशित केले. मो.९९२१०४५१२१ / ९६०४४३०००२ (सर्व वाद कारंजा लाड न्यायालयाअंतर्गत) (याआवृत्तीमधील सर्व जबाबदारी संपादकावर राहिल)
१ २ ३ ४ ५ ६

## उमरगा तालुक्यातील कारखान्यांनी शेतकऱ्यांना धरले वेठीस
## एक महिना झाला तरी उसाचे भाव जाहीर नाही

**शिवाजी गोविंदराव गायकवाड जिल्हा प्रतिनिधी**
दि( 4 ) उमरगा तालुक्यातील सहकारी कारखान्यांनी शेतकऱ्यांना भेटीस धरले केली एक महिना झालं हमीभाव जाहीर केला नाही व ऊस नेऊन सुद्धा त्यांचे बिल त्यांच्या खात्यावर जमा झाले नाहीत तालुक्यातील कारखानदार हे राजकीय वारसा असलेले आहेत निवडणुकीच्या पुढे मोठमोठे आश्वासन देऊन शेतकऱ्याची शुद्ध फसवणूक करत आहेत एक तर शेतकऱ्यांचे अतिवृष्टीमुळे कंबरडे मोडले आहे फक्त निवडणुकीपुरतं शेतकऱ्या बद्दल आपुलकी दाखवून त्यांचे मत घेत आहेत ऊस तोडा करण्यासाठी आले असता त्यांच्याकडून पाच ते दहा हजार चे मागणी करत असल्याचे शेतकऱ्यांमधून बोलले जात आहे शेतकरी अनेक विवेचनेमध्ये सापडलेला असून त्यांना रोजचा घर खर्च सुद्धा भागवणे महाग झाल्या आहे शासनाने अतिवृष्टी मध्ये तुटपंजी मदत करून आम्ही शेतकऱ्याचे हित साधणारे आहोत असा देखावा दाखवताना दिसत आहे वास्तविक पाहता प्रत्यक्ष मात्र एकरी दहा हजार रुपये देऊन सपसेल शेतकऱ्याची फसवणूक केलेली आहे कारखानदारांनी मापात ही पाप करत असल्याचे शेतकऱ्यांतून बोलले जात आहे शासन मात्र या बाबीकडे डोळे झाक करताना दिसत आहे कारण कारखानदार हे सरकारमध्ये असल्याकारणाने शेतकऱ्यांची नाहक लूट होत आहे शेतकरी ऊसाला पाणी द्यायचं बंद करून कारखान्याकडे डोळे लावून बसले असता त्यांच्या अर्धवट ऊस तोडी करून तेथील टोळी उचलण्याचा महापाप करताना दिसत आहेत शेतकरी राजा मात्र हाताश होऊन ऊस वळताना डोळ्यात पाणी आणत आहे व हा कारखाना नाही मिळाला तर दुसरा कारखाना चे उंबरटे शिजवताना दिसत आहे अशामध्ये त्यांच्या उसाचे भावही जाहीर न करता हमीभाव जाहीर न करता व उसाचे नेलेले उसाचे बिल ही जमा करत नाहीत असे शेतकऱ्यातून बोलले जात आहे शेतकऱ्यांचे मुलाचे लग्न शिक्षण व दवाखाना या बाबी बिल न आल्याकारणाने सावकार कडे धाव घ्यायची वेळ शेतकऱ्यावर येऊन ठेपली आहे तरी लवकरात लवकर हमीभाव जाहीर करून शेतकऱ्यांचे बिल त्यांच्या खात्यावरती जमा करावे अशी शेतकऱ्यांतून मागणी होताना दिसत आहे

## युनूस फजलानी युनानी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांची जळगाव येथील इकरा युनानी महाविद्यालया मार्फत आयोजित क्रीडा स्पर्धा : युनिमिट २०२५ मध्ये उत्कृष्ट कामगिरी

**कन्नड़**
जळगाव येथील इकरा युनानी महाविद्यालया मार्फत आयोजित : युनिमिट २०२५ या शिर्षाखाली विविध क्रीडा स्पर्धा व सांस्कृतिक कार्यक्रमाचे दि. २५/११/२०२५ ते २७/११/२०२५ या कालावधीत इकरा कॅम्पस, जळगाव येथे आयोजन करण्यात आले होते.
या क्रीडा स्पर्धा व सांस्कृतिक कार्यक्रमा मध्ये युनूस फजलानी युनानी महाविद्यालयाच्या ५३ विद्यार्थांनी सहभाग घेतला ज्यामध्ये मुलांनी क्रिकेट, फुटबॉल, कॅरम सिंगल, कॅरम डबल, धावणे १०० मी. डिस्क फेक, कविता स्पर्धा व मुलींनी खो खो , गोळा फेक, थाळी फेक, नात, संगीत खुर्ची व लिगोरी या स्पर्धा मध्ये भाग घेतला.
उपरोक्त संबंधित स्पर्धेमध्ये मुलांनी क्रिकेट मध्ये ७ युनानी महाविद्यालयातून अंतिम फेरी गाठत विजय प्राप्त केले. तसेच, फुटबॉल मध्ये अंतिम फेरीमध्ये स्थान पटकावले होते. कॅरम मध्ये सिंगल तौसिफ़ या विद्यार्थाने विजय प्राप्त केले व कॅरम डबल मध्ये अ रसलान व नुसैर या विद्यार्थाने अंतिम फेरी गाठली. धावण्याच्या शर्यतीत शारीम या विद्यार्थीने विजय प्राप्त केले, थाळी फेक मध्ये तौहीद या विद्यार्थाने विजय संपादन केले. व कविता स्पर्धे मध्ये अंतिम फेरी गाठून उत्कृष्ट कामगिरी केली.



विजेत्या संघासोबत डॉ. जुबेर, मौ. जकरीया रंदेरा, डॉ अमीर भाईजी डॉ. शोएब शाह, मौ. याहया रंदेरा प्रा. इमरान पठाण डॉ. मकील, डॉ. शादिया डॉ. अरहमा व विद्यार्थी

तसेच, मुलींनी सुद्धा खो खो मध्ये अंतिम फेरी गाठली होती. गोळा फेक मध्ये महेक खान या विद्यार्थिनीने अंतिम विजय संपादन केले व थाळी फेक मध्ये अंतिम फेरी गाठली. नात स्पर्धे मध्ये अरिबा या विद्यार्थिनीने अंतिम विजय संपादन केले, संगीत खुर्ची मध्ये शादमा या विद्यार्थिनीने अंतिम विजय संपादन केले व अर्शिया या विद्यार्थीनीने अंतिम फेरी गाठली व लिगोरी स्पर्धे मध्ये अंतिम फेरी गाठली.
क्रिकेट मध्ये मन ऑफ द मॅच व उत्कृष्ट फलंदाज शारीम या विद्यार्थाने पटकावले.
या क्रीडा स्पर्धा मध्ये उत्कृष्ट कामगिरी बजावून विविध स्पर्धा मध्ये विजय प्राप्त केल्याबद्दल संस्थेचे अध्यक्ष श्री फारूक रंदेरा, प्रा. डॉ. पठाण इम्रान, क्रीडा समन्वयक डॉ. शोएब शाह, डॉ. मलिक तौहीद, डॉ. अमीर भाईजी, डॉ. शादिया तहसीन, डॉ. अरहमा व सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले.

## सावळदबारा–देऊळगाव गुजरी रस्त्याचे काम लवकर सुरू करा; अन्यथा तीव्र आंदोलन — महाविकास आघाडीचा इशारा”

महाराष्ट्र जीत

**प्रतिनिधी सोयगाव..**
**सोयगाव**
दिनांक 9 ऑक्टोबर 2025 रोजी जालना लोकसभा मतदारसंघाचे महाविकास आघाडीचे खासदार सन्माननीय डॉ. कल्याणरावजी काळे साहेब यांच्या अध्यक्षतेखाली तहसील कार्यालयात घेण्यात आलेल्या आढावा बैठकीत, तहसीलदार मेने मॅडम यांच्या उपस्थितीत सर्व प्रशासकीय विभागांच्या अधिकाऱ्यांसोबत विविध विकासकामांवर चर्चा झाली. या बैठकीत सावळदबारा ते देऊळगाव गुजरी मार्गाच्या कामाच्या मंजुरीकरिता खासदार साहेबांना निवेदन देण्यात आले असता, त्यांनी त्या कामाकरिता सकारात्मक आदेश देण्यात येतील असे स्पष्ट निर्देश दिले होते. तथापि, आदेश मिळूनही काही अधिकाऱ्यांकडून कामासंदर्भात टाळाटाळ सुरू असून निर्णयाची अंमलबजावणी होत नाही, अशी ग्रामस्थांची नाराजी आहे. या अनुषंगाने आज दिनांक 4/12/2025 रोजी (गुरुवार) महाविकास आघाडी तर्फे — आनंद जाधव (युवक अध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष – श.प. गट), राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे कार्यकर्ते सुनील चव्हाण व दिलीप देशमुख यांच्या वतीने तहसीलदार मेने मॅडम यांना पुनश्च निवेदन देण्यात आले. रस्त्याचे काम सुरू करण्याबाबत संबंधित विभागाने तातडीने कारवाई करावी, अशी ठाम मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. महाविकास आघाडी व पंचक्रोशीतील नागरिकांनी स्पष्ट इशारा दिला आहे की — “सरकारी यंत्रणा व संबंधित विभागांनी विलंब न करता रस्त्याच्या कामाला तात्काळ सुरुवात करावी; अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्यात येईल आणि उद्धवणाऱ्या परिस्थितीस प्रशासन जबाबदार राहील.”



# महापालिका निवडणुकांचा बिगुल डिसेंबरच्या तिसऱ्या आठवड्यात!
## राज्यातील मनपा आयुक्तांनी दर्शविली तयारी

**मुंबई :** राज्यातील महापालिकांची निवडणूक डिसेंबरच्या तिसऱ्या आठवड्यात जाहीर होण्याची शक्यता आहे. राज्य निवडणूक आयोगाने गुरुवारी राज्यातील सर्व महापालिका आयुक्तांची ऑनलाइन बैठक घेतली. त्यात निवडणुकीसाठीची आमची तयारी असल्याचे बहुतेक आयुक्तांनी सांगितल्याची माहिती सूत्रांनी दिली.
राज्याचे निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे आणि सचिव सुरेश काकाणी यांनी या बैठकीत मतदार याद्या अंतिमरीत्या प्रसिद्ध करण्याबाबत आयुक्तांना विचारणा केली. आयोगाने या याद्या १० डिसेंबरला प्रसिद्ध करण्याचे आदेश दिले आहेत. मात्र, त्यासाठी आणखी दोन-तीन दिवस लागू शकतात, असे काही आयुक्तांनी सांगितले. तसा अवधी देण्याची तयारी आयोगाने दर्शविली. आता आयोग ८ डिसेंबरला पुन्हा आयुक्तांची बैठक घेऊन निवडणुकीसंदर्भातील पूर्वतयारीचा (जसे कर्मचारी व इतर व्यवस्था) आढावा घेईल. साधारणत: डिसेंबरच्या तिसऱ्या आठवड्यात महापालिका निवडणूक जाहीर होण्याची शक्यता असल्याचेही सूत्रांनी सांगितले.

**प्रभागनिहाय मतदार याद्या अचूक करा**
महापालिका निवडणुकांच्या मतदार याद्यांमधील संभाव्य दुबार मतदारांचा काटेकोर शोध घेऊन प्रत्यक्ष मतदानाच्या वेळीदेखील दक्षता घ्यावी. प्रारूप मतदार याद्यांवरील प्राप्त हरकती आणि सूचनांची पडताळणी करून वेळेवर निपटारा करावा. याशिवाय प्रभागनिहाय मतदार यादी



तयार करताना झालेल्या चुका निर्दशनास आल्यास तक्रारींची वाट न पाहता स्वत:हून दुरुस्तीबाबत कार्यवाही करावी, असे निर्देश वाघमारे यांनी आयुक्तांना दिले.

**दुबारांची यादी प्रसिद्ध करा**
दुबार मतदारांची यादी संबंधित महापालिकेने आपल्या सूचना फलकावर आणि संकेतस्थळावर प्रसिद्ध करावी. त्याबाबत राज्य निवडणूक आयोगाने २९ ऑक्टोबर २०२५ रोजी दिलेल्या आदेशानुसार कार्यवाही करावी. मतदार यादीतील संभाव्य दुबार मतदाराच्या नावासमोर दोन स्टार (**) दर्शविण्यात आलेले आहेत. असा मतदार कुठल्या मतदान केंद्रावर मतदान करणार आहे, याबाबत आवाहन करण्यात यावे.
आवाहनाला प्रतिसाद मिळाल्यानंतर त्या मतदारांकडून तो कोणत्या मतदान केंद्रावर मतदान करणार आहे, याबाबत विहित नमुन्यात अर्ज भरून घ्यावा. अशा मतदाराने नमूद केलेले मतदान केंद्र वगळता त्यास उर्वरित कोणत्याही मतदान केंद्रावर मतदान करता येणार नाही, असे वाघमारे यांनी स्पष्ट केले.
संभाव्य दुबार नाव असलेल्या मतदाराकडून प्रतिसाद न मिळाल्यास तो मतदार मतदान केंद्रावर मतदानासाठी आल्यास त्याच्याकडून त्याने इतर कोणत्याही मतदान केंद्रावर मतदान केले नसल्याबाबत किंवा करणार नसल्याचे विहित नमुन्यातील हमीपत्र लिहून घेण्यात येईल.

# कन्नडमध्ये अचानक वाढले भटक्या कुत्र्यांचे प्रमाण; शाळकरी मुलांमध्ये दहशत
## नागरिकांनी नगरपरिषदेची तातडीने कारवाईची मागणी

महाराष्ट्र जीत

**कन्नड प्रतिनिधी :**
कन्नड शहरात भटक्या कुत्र्यांचा विळखा दिवसेंदिवस वाढत चालला आहे. शहरातील गल्ली–बोळ, कॉलनी आणि मुख्य रस्त्यांवर 10–15 च्या टोळक्यात भटके कुत्रे मुक्तपणे फिरताना दिसतात. यामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून विशेषत: लहान मुले, महिला आणि ज्येष्ठ नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न गंभीर झाला आहे.
सकाळी शाळा, कॉलेज किंवा कामावर जाणाऱ्या नागरिकांवर या कुत्र्यांचे हल्ले वाढले आहेत. अनेक ठिकाणी मुलं आणि वृद्ध जखमी होण्याच्या घटना समोर येत आहेत. नागरिकांचे म्हणणे आहे की अशा घटना आता रोजच्या रोज ऐकू येत आहेत, ज्यामुळे लोकांमध्ये भीती आणि चिंतेचे वातावरण अधिक वाढत आहे.
शहरवासियांचा आरोप आहे की





छत्रपती संभाजीनगर येथून कुत्र्यांनी भरलेली गाडी आणून कन्नडमध्ये सोडली जाते, त्यामुळे शहरातील भटक्या कुत्र्यांची संख्या अचानक वाढल्याचे दिसत आहे. काही परिसरात परिस्थिती एवढी गंभीर झाली आहे की लोक संध्याकाळी बाहेर पडायलाही घाबरू लागले आहेत.
स्थानिकांनी कन्नड नगरपरिषद आणि मुख्याधिकारी रविंद्र लांडे यांनी तात्काळ हस्तक्षेप करावा, अशी मागणी केली आहे. विशेष मोहिम राबवून भटक्या कुत्र्यांवर नियंत्रण आणावे आणि नागरिकांना सुरक्षित वातावरण उपलब्ध करून द्यावे, अशी मागणी शहरवासीयांनी एकमुखाने केली आहे.

**नागरिकांची आशंका:**
**“कुत्र्यांचा दहशत… मुले शाळेत जाण्याला घाबरत आहेत!”**
“आपल्या मुलांच्या आणि वृद्धांच्या जीवावर बेतलंय… नगरपरिषदेनं तातडीने कारवाई करावी, नाही तर परिस्थिती हाथाबाहेर जाईल.” कन्नड शहरातील नागरिकांनी प्रशासनाला आवाहन केले आहे की ही समस्या गंभीरतेने घेऊन तातडीनं ठोस तोडगा काढावा.

# "पोस्ट मॅपिंगच्या कचाट्यात अडकले किनवटच्या आदिवासी प्रकल्प कार्यालयाचे पगार ...
## आदिवासी प्रकल्प कार्यालयाच्या ढिसाळ नियोजनामुळे कर्मचारी आर्थिक संकटात...

महाराष्ट्र जीत

**,किनवट :** आदिवासी विकास विभागामार्फत प्रकल्प कार्यालय किनवट तसेच या प्रकल्प कार्यालय अंतर्गत कार्यरत असलेल्या शासकीय आश्रमशाळा, आदिवासी मुलामुलींची वस्तीगृहे तसेच कार्यालयीन कर्मचारी यांचे वेतन गेल्या महिन्यांपासून पोस्ट मॅपिंग प्रक्रियेच्या कारणास्तव थांबले असून जवळपास ५०० कर्मचारी प्रत्यक्ष उपासमारीच्या उंबरठ्यावर पोहोचले आहेत. "हक्काचा पगार वेळेत देणे ही मूलभूत जबाबदारी असताना प्रशासनाने आमच्यावर ही वेळ आणली, हे अमानुष आहे," अशा शब्दांत कर्मचारी वर्गात संताप व्यक्त होत आहे.या याचा फटका १६ शासकीय आश्रम शाळा,१४ शासकीय आदिवासी मुलामुलींची वस्तीगृहे कार्यरत यामध्ये एकूण सुमारे ५०० कर्मचारी कार्यरत असून सर्वांचे पगार एका महिन्यांपासून मिळालेले नाहीत.काही कर्मचाऱ्यांना मुलांच्या फी, घरभाडे, वैद्यकीय खर्च यासाठी इतरांकडून पैसे उसने घ्यावे लागत आहेत, अशी माहिती सूत्रांनी दिली.पोस्ट मॅपिंगची पडताळणी व मंजुरी लांबणीवर पडत असून, याबाबत उच्चाधिकाऱ्यांकडे वारंवार पाठपुरावा करण्यात आला तरी ठोस निर्णय न घेतल्याने कर्मचाऱ्यांमध्ये असंतोष वाढत आहे. शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी आंदोलनाच्या तयारीत असल्याचे वातावरण तयार होत आहे . वृत्त लिही पर्यंत काही मोजक्या शाळांचे वेतन होण्याच्या मार्गावर असल्याचे समजते पण बाकीच्यांचे कधी होणार हे पाहणे तितकेच गरजेचे आहे. ही परिस्थिती नांदेड जिल्ह्यासह राज्यात ही सारखीच असल्याचे दिसून येत आहे. मग आदिवासी विकास विभाग कुंभकर्णी झोपेत होते की काय...? असा सवाल कर्मचारी दबक्या आवाजात विचारू लागले आहेत.

आदिवासी विकास विभाग
आदिवासी जनहिताय
महाराष्ट्र शासन

**आमच्या पोटापेक्षा कागदांना प्राधान्य आहे काय साहेब.......?**
**कर्मचाऱ्यांचा केविलवाणा सवाल...?**
**कर्मचारी म्हणतात—**
“पदांची ताळमेळ ही प्रक्रिया आवश्यक आहे, परंतु त्यासाठी कर्मचाऱ्यांचे मूलभूत हक्क रोखणे योग्य नाही. सरकारी यंत्रणेचा गोंधळ आम्ही का भोगायचा.......?” मुलांचे शिक्षण, आई,वडिलांचे गोळ्या औषध कसे घ्यावे, ईतर महत्वपूर्ण कामे कसे भागवावी हाच एक प्रश्न भेडसावत आहे...

**पोस्ट मॅपिंग चा घोळ मिटेना....**
प्रकल्प कार्यालय किनवट तसेच यांच्या अंतर्गत येणाऱ्या शासकीय आश्रम शाळा आणि शासकीय वसतिगृह आदी कर्मचारी संख्या, रिक्त पदे आणि कार्यरत पदांच्या ताळमेळासाठी सुरू असलेल्या पोस्ट मॅपिंग प्रक्रियेत गंभीर गोंधळ निर्माण झाल्याने अनेक शाळा-वसतिगृहांचे पगार बिल प्रलंबित पडले आहेत.या प्रक्रियेतील ढिसाळ धोरण व नियोजनामुळे कर्मचाऱ्यांच्या घरखर्चापासून कर्जाच्या हप्त्यांपर्यंत सर्वच गोष्टींवर परिणाम झाला असून अनेक कुटुंबात आर्थिक चणचण निर्माण झाली आहे. प्रकल्प अधिकारी कोणता निर्णय घेणार हे पाहणे तितकेच गरजेचे असल्याचेही मत कर्मचारी संघटनेच्या वतीने व्यक्त होऊ लागले आहे.

## नांदेड बसस्थानक बनले चोरट्याचे अड्डे

**मोहम्मद आमेर, दक्षिण नांदेड :-** मध्यवर्ती बसस्थानक नांदेड येथे सविता रवी शिंदे यांच्या पर्समधून 9.21 लाखांचे सोने चोरीला गेले. गर्दीचा फायदा घेत चोरट्याने चैन उघडून दागिन्यांची पिशवी लंपास केली. त्यांनी वजिराबाद पोलीस ठाणे येथे तक्रार दिली असता अज्ञातावर गुन्हा दाखल करण्यात आले. यापूर्वी मंगला राहटीकर यांचा 1.5 लाखांचा राणीहारही चोरांनी लंपास केला होता. बसस्थानकात पाकीटमारी, मोबाईल आणि पर्स चोरीच्या घटना वाढल्याने पोलीस प्रशासनाचे गस्त व CCTV निरीक्षण अपुरे असल्याचा प्रवाशांत पोलीस सुरक्षा बद्दल रोष निर्माण होत आहे.



# नागपूर परिक्षेत्रीय पोलीस क्रीडा स्पर्धेचा भंडाऱ्यात दिमाखदार शुभारंभ; पहिल्या दिवशी खेळाडूंचा जल्लोष

**प्रतिनिधी / भंडारा.**

भंडारा: पोलीस दलातील खेळाडूंच्या अंगभूत कलागुणांना वाव देण्यासाठी आयोजित 'नागपूर परिक्षेत्रीय पोलीस क्रीडा स्पर्धा २०२५' चा आज (दि. ०५) पोलीस मुख्यालय, भंडारा येथे अतिशय उत्साहात आणि शिस्तबद्ध वातावरणात शुभारंभ झाला. स्पर्धेच्या पहिल्याच दिवशी नागपूर परिक्षेत्रातील विविध जिल्ह्यांतून आलेल्या पोलीस खेळाडूंनी आपल्या अफाट ऊर्जेचे आणि क्रीडा कौशल्याचे दर्शन घडवत मैदान गाजवले. स्पर्धेच्या पहिल्या दिवसाची सुरुवात पहाटे ६:३० वाजता ५००० मीटर धावणे (पुरुष/महिला) या प्रकाराच्या अंतिम फेरीने झाली. यामध्ये स्पर्धकांनी प्रचंड चिकाटी आणि ऊर्जेचे प्रदर्शन केले. त्यानंतर ट्रॅकवर सकाळी ७:०० वाजता ४०० मीटर धावण्याची प्राथमिक फेरी आणि सकाळी ९:०० वाजता २०० मीटर धावण्याची प्राथमिक फेरी पार पडली. मैदानी प्रकारांत सकाळी ८:०० वाजता लांब उडी आणि ८:३० वाजता गोळाफेकच्या अंतिम फेऱ्यांत चुरशीची लढत पाहायला मिळाली. दुसरीकडे, पोलीस मुख्यालयातील ड्रिल शेडमध्ये खेळाडूंच्या वजन तपासणीनंतर सकाळी ८:०० वाजता ज्युदो स्पर्धेची अंतिम फेरी संपन्न झाली.





**सांघिक खेळांमध्ये चुरस**

मैदानी शर्यतींसोबतच सांघिक खेळांमध्येही दिवसभर मोठी चुरस पाहायला मिळाली. परेड ग्राउंडवर सकाळी ७:०० वाजता गडचिरोली विरुद्ध चंद्रपूर आणि ८:०० वाजता वर्धा विरुद्ध नागपूर ग्रामीण यांच्यात हॉकीचे रोमांचक सामने झाले. महिलांचे खो-खो सामने सकाळी ७:३० आणि दुपारी ४:३० वाजता, तर पुरुषांचे खो-खो सामने दुपारी २:०० आणि ३:०० वाजता पार पडले. दुपारच्या सत्रात १:०० आणि ३:०० वाजता फुटबॉलच्या सामन्यांचा थरार अनुभवता आला.

सायंकाळच्या सत्रात ड्रिल शेडमध्ये ६:०० वाजता 'वुशु' या खेळाची अंतिम फेरी पार पडली. याशिवाय दुपारी ३:०० वाजल्यापासून ते रात्री ७:०० वाजेपर्यंत विविध मैदानांवर कबड्डी, व्हॉलीबॉल, हॅन्डबॉल आणि बास्केटबॉलचे (पुरुष व महिला गट) साखळी सामने रंगले होते. या संपूर्ण स्पर्धेत नागपूर परिक्षेत्रातील भंडारा, चंद्रपूर, गडचिरोली, वर्धा, गोंदिया आणि नागपूर ग्रामीण या संघांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला आहे.

**आजचे नियोजन**

आज, दिनांक ०६ डिसेंबर रोजी स्पर्धेचा दुसरा दिवस असून, सकाळी ६:३० वाजल्यापासून पुढील क्रीडा प्रकारांना सुरुवात होईल. यामध्ये प्रामुख्याने अथलेटिक्सच्या विविध अंतिम फेऱ्या आणि सांघिक खेळांचे पुढील साखळी व बाद फेरीचे सामने पोलीस मुख्यालय मैदानावर नियोजित वेळेनुसार खेळवण्यात येणार आहेत.

# हिंदी मीडिया लेखन व संगीत आणि सिनेमा या विषयावर उत्साहात कार्यशाळा संपन्न

**महाराष्ट्र जीत प्रतिनिधी प्रदीप पोटफोडे**

शिवछत्रपती महाविद्यालय, पाचोड येथे पी. एम. उषा सॉफ्ट कॉम्पोनेन्ट अंतर्गत "हिंदी मीडिया लेखन तसेच संगीत आणि सिनेमा" या विषयावर एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. ही कार्यशाळा ०५ डिसेंबर २०२५ रोजी हिंदी विभागाच्या वतीने यशस्वीरीत्या पार पडली.

या कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी म्हणून श्री. शहाजी गोरे सर उपस्थित होते. तसेच दुसरे प्रमुख अतिथी म्हणून डॉ. चंद्रकांत जोगदंड सर यांनी विद्यार्थ्यांना मीडिया लेखन, संगीत आणि सिनेमा क्षेत्रातील नवनवीन घडामोडींबाबत मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान महाविद्यालयाचे प्राचार्य आदरणीय डॉ. चंद्रसेन कोठावळे सर यांनी भूषविले. त्यांनी विद्यार्थ्यांनी अशा कार्यशाळांचा अवश्य लाभ घ्यावा तसेच मीडिया क्षेत्रातील उपलब्ध संधींबाबत सविस्तर माहिती दिली.

कार्यक्रमाची प्रस्तावना हिंदी विभागाचे प्रमुख डॉ. उत्तम जाधव सर यांनी केली. त्यांनी कार्यशाळेची उद्दिष्टे स्पष्ट करून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अशा उपक्रमांचे महत्त्व अधोरेखित केले.

कार्यक्रमाचे सुत्रसंचालन हरिप्रसाद बिडवे सर यांनी उत्साहपूर्ण पद्धतीने केले. तर कार्यक्रमाचा



समारोप प्रा. विनोद कांबळे सर यांच्या आभारप्रदर्शनाने झाला.

या कार्यशाळेमुळे विद्यार्थ्यांना हिंदी मीडिया लेखन, चित्रपट व संगीत क्षेत्रातील तांत्रिक बाबी, करिअरच्या संधी आणि मार्गदर्शन याबाबत अनमोल माहिती मिळाली. कार्यक्रमास महाविद्यालयातील विद्यार्थी व शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जिल्हाधिकाऱ्यांनी केली स्ट्रॉंग रूमची पाहणी; ईव्हीएम सुरक्षिततेची काटेकोर तपासणी

**प्रतिनिधी / भंडारा.**

भंडारा, दि. 05 : नुकत्याच पार पडलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांनंतर मतदान




प्रक्रियेत वापरण्यात आलेल्या ईव्हीएम तसेच मतदान साहित्याची पूर्ण सुरक्षितता सुनिश्चित करण्यासाठी भंडारा नगरपालिकेचा स्ट्रॉंग रूम वैनगंगा सभागृह, पोलीस मुख्यालय येथे तयार करण्यात आला आहे. आज या स्ट्रॉंग रूमला प्रभारी जिल्हाधिकारी राजेंद्रकुमार जाधव यांनी भेट देऊन प्रत्यक्ष पाहणी केली. यावेळी जिल्हा माहिती अधिकारी शैलजा वाघ दांदळे उपस्थित होत्या.

या पाहणीदरम्यान जिल्हाधिकाऱ्यांनी सुरक्षिततेसंबंधी सर्व बाबींचा सविस्तर आढावा घेतला. स्ट्रॉंग रूम परिसरातील सीसीटीव्ही यंत्रणा, तैनात सुरक्षा पथके, प्रवेश नियंत्रण, रात्रपाळीतील गस्त व्यवस्था तसेच सुरक्षा नोंदवही यांची तपासणी करण्यात आली. तसेच स्ट्रॉंग रूमच्या बाहेरील परिघात अनधिकृत व्यक्तींना प्रवेश रोखण्यासाठी करण्यात आलेल्या बंदोबस्ताचीही माहिती घेण्यात आली. प्रभारी जिल्हाधिकाऱ्यांनी यावेळी उपस्थित अधिकाऱ्यांना सुरक्षेच्या बाबतीत सतर्क राहण्याच्या स्पष्ट सूचना दिल्या. स्ट्रॉंग रूम परिसरात जिल्हा प्रशासन, पोलीस विभाग आणि निवडणूक आयोगाच्या सूचनांनुसार सुरक्षा व्यवस्था तैनात करण्यात आली आहे.

# मोखाड्यात ईद मिलाद निमित्त मोफत आरोग्य शिबीर

### शंभराहून अधिक नागरिकांची तपासणी

**महाराष्ट्र जीत : दयानंद शिंदे**

**मोखाडा –** प्रेषित मोहम्मद पैगंबर यांच्या जयंतीनिमित्त मोखाड्यात



जशने ईद मिलाद कमेटी व आय झोन ऑप्टिकल्स नासिक तसेच साई बाबा हार्ट इन्स्टिट्यूट अण्ड मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल नाशिक यांच्या संयुक्त वतीने मोखाडा येथे मोफत डोळे तपासणी शिबिर,ईसीजी तसेच शूगर व जनरल बॉडी चेक अप शिबीराचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी नाशिक येथील तज्ञ वैद्यकीय अधिकारी डॉ.सोनाली महाले, डॉ.इम्रान शेख व डॉ.तुषार सोनवणे आदी उपस्थित होते.

शिबीर दरम्यान शंभराहून अधिक सर्व धर्मिय नागरिकांनी त्याचा लाभ घेतला आहे.यावेळी कमेटीचे अध्यक्ष जमशिद (लारा) शेख, कार्याध्यक्ष हाजी आरिफ शेख, सर्व कमिटी पदाधिकारी मोलाचे सहकार्य राजु इसुफ शेख, आदी प्रमुख उपस्थित होते.त्याचप्रमाणे जशने ईद मिलाद कमेटी सुन्नी जामा मस्जिद ट्रस्ट यांच्या कडून आज रात्री इमाम अहमद रजा मदरसा मधील मुला, मुलींचा प्रोग्राम आयोजित केले असून ६ डिसेंबर ला तकरीर ( प्रवचन ) नात याचे आयोजन केले असून ०७ डिसेंबर तारखेला कवाली चा शानदार मुकाबला होणार आहे या कव्वाली मध्ये टीव्ही स्टार अजीम नाजा आणि दुसरे कव्वाल नौशाद अली खान (दिल्ली) येथून येणार आहे.

विशेष म्हणजे या दोन्ही दिवस येणाऱ्या सर्व पाहुण्यांना जेवणाची सोय मिलादुनबी कमेटी कडून करण्यात येत असल्याची माहिती कमेटीचे अध्यक्ष जमशिद (लारा) शेख यांनी बोलताना सांगितले आहे.

### *सामाजिक कार्यकर्ते राजेंद्र श्रीवंत यांना आदर्श समाजसेवक पुरस्कार तर किशोर सकट यांना क्रांतिवीर लहुजी साळवे समाज समाजरत्न पुरस्कार जाहीर*



**देवळाली कॅम्प प्रतिनिधी गोकुळ लोखंडे**

देवळाली कॅम्प भगूर येथील सामाजिक कार्यात आपला ठसा उमटवणारे तसेच शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रामध्ये उल्लेखनीय काम करणारे व ग्रामीण भागातील खेड्यापाड्यांमध्ये शाळेमध्ये जाऊन विद्यार्थ्यांना शालेय वस्तूचे वाटप त्यांना गणवेश आरोग्य विषयी मार्गदर्शन औषधे वाटप तसेच गरजू विद्यार्थ्यांना मुलांना मुलींना सर्वतोपरी मदत करणारे राजेंद्र श्रीवंत यांच्या कार्याची दखल घेत तसेच लहुजी सेनेचे जिल्हा अध्यक्ष किशोर सकट यांच्याही सामाजिक शैक्षणिक कला क्रीडा व समाजाचे हिताचे उपक्रम राबवून शासनाच्या अनेक योजना यांचा लाभ घेऊन बेरोजगारांना रोजगार उपलब्ध करून देणारे किशोर भाऊ सकट यांची क्रांतिवीर लहुजी साळवे समाज रत्न पुरस्कार याकरिता सुवर्णभरारी बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेच्या संस्थापक अध्यक्ष डॉक्टर सारिका ताई नागरे संस्थापक अध्यक्ष यांच्या वतीने जाहीर करण्यात आला आहे माननीय डॉक्टर राधाकृष्ण विखे पाटील मंत्री जलसंपदा महाराष्ट्र राज्य तसेच प्रमुख पाहुण्यांचे हस्ते पारितोषिक वितरणाचा कार्यक्रम रविवार दिनांक 7 /12/2025 रोजी सकाळी 11 वाजेला लोणी प्रवारा जिल्हा अहिल्यानगर येथे विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या उपस्थितीत केला जाणार आहे.

# बिबट्याचा शाळकरी मुलावर हल्लाचा प्रयत्न...

**अमोल टोपले**

**मोखाडा** : गेल्या महिनाभरापासून मोखाड्यात बिबट्याचा वावर आहे. रोजच कुठे ना कुठ? बिबट्याचे नागरिकांना दर्शन होत आहे. वेगवेगळ्या भागात कोंबड्या, बर्कया घरातून फस्त केल्याच्या घटना देखील घडल्या आहेत. यामुळे सर्वत्र भीतीचे वातावरण आहे. सोमवारी २४ नोव्हेंबरला सकाळी बिबट्याने एका तिसरीत शिकर्णावा खोच येथील शाळकरी मुलावर हल्लाचा प्रयत्न केल्याची घटना घडली आहे. परंतु कुटूंबियांच्या सतर्कतेमुळे बालक सुखरूप बचावले आहे. या घटनेने तालुक्यात एकच खळबळ उडाली आहे. मोखाडा तालुक्यात बिबट्याने सर्वत्र धुमाकूळ घातला आहे. अनेक गावपाड्यांत त्याने वर्कया, कोंबड्या, कुत्रे फल्त केले आहेत. तर



काही दिवसांपूर्वीच मोखाडा- त्र्यंबकेश्वर मार्गावर एका दुचाकीस्वारावर हल्लूयाचा प्रयत्न देखील केला होता. या घटना ताज्या असतांना, सोमवारी सकाळी खोच ग्राम पंचायतीच्या हद्दीतील पिपंळपाडा येथील संकेत सुनिल भोये वय (९) हा सकाळी सहा वाजता शेकोटी पेटवण्यासाठी घराच्या कोर्पयात येऊन बसला होता. त्याला पाहता क्षणीच दबा धरून बसलेल्या बिबट्याने कुंपणातून उडी मारून त्याच्यावर हल्ला करण्याचा प्रयत्न केला. परंतु दारात बसलेल्या आजी व कुटूंबियांनी आरडा-ओरडा केल्याने विबट्याने तेथून पळ काढला व बालक सुखरूप बचावला आहे. मात्र, या घटनेने गेल्या काही दिवसांपासून पशुंवर हल्ला करणाया बिबट्याची मजल आता माणसांवर हल्ला करण्यापर्यंत येऊन ठेपल्याने, नागरिकांम ध्ये बिबपाची दहशत निर्माण झाली आहे. दरम्यान, घटनास्थळी जाऊन पहाणी करून पुढील कार्यवाही तातडीने करणार असल्याचे वनक्षेत्रपाल विनोद दळवी यांनी सांगितले आहे.

# मुंबई दादर रेल्वे स्थानकाचे चैत्यभूमी नामविस्तार करा - महाराष्ट्र रत्न अनिलभाई गांगुर्डे..

**नाशिकरोड (प्रतिनिधी) गोकुळ लोखंडे**

*भिमटोला सामाजिक संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष महाराष्ट्र रत्न अनिलभाई गांगुर्डे यांच्या नेतृत्वाखाली नाशिक विभागाचे महसूल अप्पर आयुक्त जितेंद्र वाघ साहेब* यांची भेट घेऊन वरील विषयाचे निवेदन दिले..

**निवेदनाचा विषय असा आहे**

*1) मुंबई दादर रेल्वे स्थानकाला चैत्यभूमी असे नाव देण्यात यावे..*



*2) नाशिक विमानतळास कर्मवीर दादासाहेब गायकवाड यांचे नाव देण्यात यावे..*

*3) बुद्धगया येथील महाबोधी विहार बौद्धांच्या ताब्यात देण्यात यावे..*

*4) मुखेड येथील सत्याग्रही स्मारकाचे काम तातडीने सुरू करा या व अन्य मागण्यांचे निवेदन देण्यात आले..*

याप्रसंगी भिमटोला सामाजिक संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष महाराष्ट्र रत्न अनिलभाई गांगुर्डे, आंबेडकरी चळवळीतील ज्येष्ठ नेते भिमश्री विजयराज पगारे, उत्तर महाराष्ट्र अध्यक्ष यशवंत (टिल्लूभाई) साळवे, निफाड तालुका नेते संतोष शेजवळ, गणेश जाधव, प्रसिध्दी प्रमुख प्रतिक सोनटक्के, युवा नेते प्रशांत गांगुर्डे आदी पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

# हिंदी मीडिया लेखन व संगीत आणि सिनेमा या विषयावर उत्साहात कार्यशाळा संपन्न

**प्रतिनिधी / भंडारा.**

सिहोरा/भंडारा: जिल्ह्यातील अवैध रेती तस्करी रोखण्यासाठी पोलीस प्रशासनाने कंबर कसली असून, सिहोरा पोलिसांनी एका मोठ्या कारवाईत तब्बल १८ लाख १२ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. टेमनी शिवार परिसरात ही धडक कारवाई करण्यात आली.

याबाबत सविस्तर वृत्त असे की, सिहोरा पोलीस ठाण्याचे कर्मचारी मौजा टेमनी शिवार भागात गस्त घालत होते. यावेळी टाटा कंपनीचा एक पिवळ्या रंगाचा विना क्रमांकाचा मिनी टिप्पर संशयास्पदरित्या येताना दिसला. पोलिसांनी सदर वाहन थांबवून तपासणी केली असता, त्यात रेती भरलेली आढळून आली. यावेळी वाहनचालक आरोपी दुर्गेश गेदलाल लाजे (वय २७, रा. सोख्या, ता. तुमसर) याच्याकडे रेती वाहतुकीचा परवाना (पास/रॉयल्टी) बाबत विचारणा केली असता, त्याच्याकडे कोणताही परवाना नसल्याचे स्पष्ट झाले. आरोपीने पर्यावरणाचे नियम धाब्यावर बसवून अवैध रेती वाहतूक केल्याप्रकरणी पोलिसांनी कारवाईचा बडगा उगारला आहे. या कारवाईत पोलिसांनी १८ लाख रुपये किमतीचा टाटा मिनी टिप्पर आणि १२ हजार रुपये किमतीची २ ब्रास रेती असा एकूण १८ लाख १२ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

फिर्यादी पोलीस शिपाई मोठघरे यांच्या तक्रारीवरून आरोपीविरुद्ध सिहोरा पोलीस ठाण्यात अप. क्र. २९७/२०२५ अन्वये भारतीय न्याय संहिता



कलम ३०५ (ई), महाराष्ट्र जमीन महसूल संहिता ४८ (८) आणि पर्यावरण अधिनियम कलम ७, ९ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कारवाई पोलीस अधीक्षक नुरुल हसन, अप्पर पोलीस अधीक्षक निलेश गोरे, पोलीस निरीक्षक कसोधन यांच्या मार्गदर्शनाखाली पो.ह.वा. कळपाते आणि पो.शि. मोठघरे यांनी केली. या प्रकरणाचा पुढील तपास सिहोरा पोलीस करत आहेत.

# खेलो इंडिया युनिव्हर्सिटी गेम्सः लाखनीच्या करण शेंडेची ऐतिहासिक कामगिरी; कनोइंग स्पर्धेत पटकावले कास्यपदक

**प्रतिनिधी / भंडारा.**

लाखनी (दि. ०४): जयपूर (राजस्थान) येथे पार पडलेल्या 'खेलो इंडिया युनिव्हर्सिटी गेम्स'मध्ये भंडारा जिल्ह्यातील लाखनी येथील स्व. निर्धन पाटील वाघाये महाविद्यालयाचा विद्यार्थी करण सुखदास शेंडे याने नेत्रदीपक कामगिरी केली आहे. कनोइंग व कयाकिंग प्रकारातील 'के-१ २०० मीटर' (K-1 200M) स्पर्धेत करणने कास्यपदक पटकावून जिल्ह्याचे व विद्यापीठाचे नाव उंचावले आहे.




पौर्णिमा युनिव्हर्सिटी आणि युनिव्हर्सिटी ऑफ राजस्थान यांच्या संयुक्त विद्यमाने जयपूर येथे दिनांक ०२/१२/२०२५ ते ०४/१२/२०२५ या कालावधीत खेलो इंडिया युनिव्हर्सिटी गेम्सचे आयोजन करण्यात आले होते. या प्रतिष्ठित स्पर्धेसाठी स्व. निर्धन पाटील वाघाये महाविद्यालयाचा एम. ए. प्रथम वर्षाचा विद्यार्थी करण शेंडे याची निवड झाली होती. या स्पर्धेत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे प्रतिनिधित्व करताना करणने कनोइंग व कयाकिंग क्रीडा प्रकारात आपल्या कौशल्याची चुणूक दाखवली. के-१ २०० मीटर शर्यतीत त्याने जिद्दीने खेळ करत तिसरा क्रमांक मिळवून कास्यपदकावर आपले नाव कोरले. त्याच्या या देदीप्यमान यशाबद्दल महाविद्यालयाचे कार्यकारी प्राचार्य डॉ. गणेश एम. कापसे आणि महाविद्यालयाच्या शारीरिक शिक्षण विभागाचे संचालक डॉ. सुधीर सहारे यांनी त्याचे विशेष कौतुक केले आहे. तसेच महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी करणचे अभिनंदन करून त्याला पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत. करणच्या या यशाने लाखनी परिसरात आनंदाचे वातावरण आहे.

# जागतिक दिव्यांग दिनानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन

**देगलूर प्रतिनिधी/संघपाल मदने**

देगलूर तालुक्यातील माळेगाव (मक्ता) येथील स्वामी विवेकानंद निवासी अपंग विद्यालयात जागतिक दिव्यांग दिनाचे औचित्य साधून विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी विद्यार्थ्यांसाठी बक्षीस व फळांचे वाटप करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माळेगाव केंद्राचे केंद्रप्रमुख आर. पी. जाधव हे तर प्रमुख पाहुणे म्हणून मुख्याध्यापक डी. व्ही. सर्जे, सहशिक्षक ए. टी. शेख, एस. डी. मिसाळ, एन. पी. शिवने, एस. एस. सोमवंशी आदींची प्रमुख उपस्थिती होती. प्रारंभी डॉ. हेलन केलर यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली. शाळेच्या पटांगणात विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. मुख्याध्यापकांनी विद्यार्थ्यांना अनेक उपक्रमाबद्दल माहिती दिली. विविध प्रकाराच्या स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. स्पर्धेतील गुणवंत विद्यार्थ्यांना पारितोषिक, सन्मान चिन्ह देऊन त्यांना सन्मानित करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांना फळे वाटप करून जागतिक दिव्यांग दिनाची माहिती देऊन कार्यक्रमाची सांगता झाली. कार्यक्रमास शाळेतील कर्मचारी, विद्यार्थी व नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

